आयुक्त राज्य उत्पादन शुल्क

महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय जुने जकात घर, फोर्ट, मुंबई २३

परिपत्रक

क्रमांक :सीएलआर ११२००२/वितरण/आयुक्त/सात मुंबई १३ सप्टेंबर २००२

चोरटया पध्दतीने व अवैधरित्या तयार केलेले बनावट मद्य किंवा चोरटे मद्य ,हे अधिकृतरित्या तयार केलेल्या मद्यासारखेच दिसत असल्यामुळे वितरण व्यवहारात दोन्हीमध्ये सर्वसाधारण ग्राहकाला किंवा सक्षम अधिकाऱ्याना फरक जाणवत नाही. यामुळे सदर मद्य प्याल्याने ग्राहकाच्या स्वास्थ्याला धोका पोहचतोच व त्याची फसवणूक होते. तसेच शासनाचा महसूल ही बुडविला जातो.

बनावट व चोरटया मद्यांपासून जनहित नुकसान होऊ नये म्हणून मद्य निर्मिती व मद्य वितरणाच्या बाबत मुंबई मद्य निषेध अधिनियम १९४९. व मुंबई देशी मद्य नियम १९७३ अंतर्गत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) प्रत्येक सीएलएन-१ अनुज्ञप्तीधारकांनी त्यांच्याकडे निर्माण होणारे देशी मद्याचे बॅच नंबर संगणकाव्दारे रॅन्डम पध्दतीने बॅच नंबर द्यावा. सदरहू बॅच नंबरची निवड संबंधीत प्रभारी अधिकाऱ्याच्या समोर करण्यात यावी व त्याची योग्य ती नोंद नोंदवहीत घेण्यात यावी.

२) प्रत्येक महिन्याच्या सुरवातीलाच जुने बॅच संपवून नवीन बॅच निर्माण करावी.जर एखादा जुन्या बॅचचा मोठा साठा शिल्लक असेल तर अशा साठयाला नवीन बॅच नंबर देऊन नंतरच बॉटलींग करावे.

३) प्रत्येक सीएल-१ अनुज्ञप्तीधारकांनी सीएल-२ अनुज्ञप्तीधारकाला निर्मिती केलेल्या महिन्यात व पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत पूर्ण मद्यसाठा वितरण करणे आवश्यक राहिल.

४) प्रत्येक सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनी त्यांचेकडे मद्यसाठा प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत वहातूक परवान्यावर सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांना पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५) प्रत्येक सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांनी त्यांच्याकडे मद्यसाठा प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत विक्री करण्याची दखल घ्यावी.

६) वरील दिलेल्या सूचना अनुक्रमांक १ ते ५ वरुन दिसून येईल की सर्वात जास्त विक्री होणारे देशी मद्य निर्मिती झाल्यापासून दोन महिन्याच्या आत ग्राहकांपर्यंत पोहचविले जाणार आहे. यामुळे बनावट व चोरटया पध्दतीने तयार होणाऱ्या मद्यावर अंकुश ठेवण्यास मदत होईल. तसेच संगणक किंवा रॅन्डम पध्दतीने बॅच नंबर दिल्याने बनावट लेबल छापाई करणे आणि त्यचा वापर करण्यात अडचणी निर्माण होतील.

वरील सुचनांची त्वरीत अंमलबजावणी करावी. ज्या अनुज्ञप्तीधारकांकडे जुना मद्यसाठा शिल्लक आहे त्यांनी सदर शिल्लक साठा एक नोव्हेंबर २००२ च्या आत विकण्याची काळजी घ्यावी.

ज्या सीएल-१ अनुज्ञप्तीधारकांना त्यांचे विक्री वाढविण्यासाठी एखादी योजना आखावयाची असेल आणि त्यासाठी सदर परिपत्रकाची सुट घ्यावयाची असेल त्यांनी आयुक्ताकडून रितसर अर्ज करुन परवानगी घ्यावी.

( ए.रामकृष्णन )
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति

१. सर्व जिल्हाधिकारी यांना अग्रेषित
२. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
२. अधीक्षकांनी सदरील परीपत्रकाची प्रत सर्व सीएल-१, सीएल-२ आणि सीएल-३, एफएल-२, अनुज्ञप्तीधारकास देऊन त्याची पोच त्यांच्या अभिलेखावर ठेवण्यात यावी. परीपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे अमलबजावणी करण्याबाबत सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांना सुचित करण्यात यावे.
३. सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
४ या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
५ या कार्यालयातील सर्व कार्यासने
६. अभिलेख शाखा ( ५ प्रती )
७ आयुक्तांचे स्वीय सहाय्यक ( २ प्रती )

illegal liquor.